प्रेस नोट

जा.क्र. २६८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः– २३/०५/२०१८

# पोलीस स्टेशन भंडारा डि.बी.पथकाची कार्यवाही

भंडारा– डि.बी पथक पोलीस स्टेशन भंडारा यांनी सदर गुन्हयातील फिर्यादी योगेशचंद्र रामदासराव धुर्वे वय ४० वर्ष रा. नाशीक नगर भंडारा यांची आई श्रीमती आशा हि किरायाचे घराचे समोरील दाराला ताला लावुन जावयाचे घरी भंडारा येथे गेली असता, कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा ताला नकली चाबीने उघडुन आत प्रवेश करून बेडरूम मधील लोखंडी आलामारीचा लॉक डुप्लीकेट चाबीने उघडुन आलमारीतील लॉकर तोडुन सोन्याचे दागीने एकुण २,१६,०००/रु. चा माल चोरून नेल्याने, फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे अप क्र. ३४५/२०१८ कलम ४५४,४५७,३८० भा.द.वी. चा गुन्हा अज्ञात आरोपी विरूध्द नोंद करून तपासात घेतला.

सदर घटणेची माहीती प्राप्त होताच पोलीस स्टेशन भंडारा येथील मा. पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र मानकर यांचे मार्गदर्शनाखाली डि.बी. पथकातील अधीकारी व कर्मचारी हे घटणास्थळी जावुन फिर्यादीस भेटुन विचारपुस करून लगेच आरोपीचा व चोरी गेलेल्या सोन्याच्या दागीन्याचा शोध घेण्याकरीता पो.स्टे. हद्दीत रवाना होवुन व गुप्त माहीती दारांना तात्काळ माहीती देवुन संपुर्ण शहरात गुप्त बातमीदारांचे जाळे पसरवुन डि.बी. पथकाने तपासाचे चक्र गतीने फिरवुन गुन्हयातील आरोपी यास नाशीक नगर भंडारा येथुन गुन्हा दाखल झाल्यानंतर फक्त २४ तासामध्ये अत्यंत अथक परीश्रमाने व शिताफतीने पकडण्यास आले, आरोपीकडुन गुन्हयात चोरीस गेलेले सोन्याचे दागीने कि. २,१६,०००/रु. चा माल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीस पकडण्या करीता केलेल्या अथक प्रयत्नाबाबत मा. विनीता साहू पोलीस अधीक्षक सा. भंडारा यांनी डि.बी. पथकाचे कौतुक केले.

सदर संपुर्ण कार्यवाही मा. विनीता साहू पोलीस अधीक्षक मा. रश्मी नांदेडकर, अप्पर पोलीस अधीक्षक सा. भंडारा, मा. श्री. जोगदंड उपवीभागीय पोलीस अधीकारी सा. भंडारा, मा. रवींद्र मानकर पोलीस निरीक्षक सा. भंडारा यांचे मार्गदर्शनाखाली डि.बी. पथकातील पोउपनी. सचीन गदादे, पोहवा. पुरूषोत्तम शेंडे पो.ना. प्रशात गुरव, विजय तायडे, पोशी. मार्कंड डोरले, क्रिष्णा कातकडे, संदीप बन्सोड, अतुल मेश्राम डि.बी.पथक पोलीस स्टेशन भंडारा यांनी पार पाडले सदर गुन्हयाचा तपास पोउपनी. गदादे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत .

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.